# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 16 May 2025

Time 7.10 AM to 7.20 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १६ मे २०२५ सकाळी ७.१० मि.**

****

- विधीमंडळाच्या विधेयकांवर राज्यपालांना निर्णय घेण्यासाठी कालमर्यादा निश्चित करण्याचा अधिकार न्यायालयाला आहे का–राष्ट्रपतींची सर्वोच्च न्यायालयाकडे विचारणा
- पाकिस्तानकडे असलेली अण्वस्त्रं आंतरराष्ट्रीय अणु ऊर्जा संस्थेने आपल्या ताब्यात घ्यावीत–संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांचं प्रतिपादन
- ८० टक्के सांडपाण्याचा पुनर्वापर करण्याची आवश्यकता जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडून व्यक्त
- राज्यात विविध ठिकाणी तिरंगा यात्रेच्या माध्यमातून नागरिकांचे सैन्यदलांना अभिवादन

आणि

- खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेचा समारोप–१५८ पदकांसह महाराष्ट्र पहिल्या स्थानावर

****

राज्य विधीमंडळानं मंजूर केलेल्या विधेयकांवर राज्यपालांना निर्णय घेण्यासाठी कालमर्यादा निश्चित करण्याचा अधिकार न्यायालयाला आहे का, अशी विचारणा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्वोच्च न्यायालयाकडे केली आहे. तामिळनाडू विधानसभेने मंजूर केलेली विधेयकं राज्यपालांकडे दीर्घ काळ प्रलंबित राहिल्या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने हे निरीक्षण नोंदवतांना, राज्यपालांनी कालमर्यादा न पाळल्यास त्यांची संमती गृहीत धरण्यात यावी असं म्हटलं होतं. त्यासंदर्भात १४ प्रश्न राष्ट्रपतींनी उपस्थित केले. संविधानाच्या कलम २०० आणि २०१ मधे

राज्यपालांच्या कार्यपद्धतीविषयीच्या तरतुदींमध्ये अशी कालमर्यादा पाळण्याबाबतचा उल्लेख नाही, असं निरीक्षण नोंदवत, न्यायालयाचा हा निर्णय राज्यपाल आणि राष्ट्रपतींना घटनेने दिलेली शक्ती आणि अधिकारांवर अतिक्रमण करणारा आहे का, याचा विचार करावा असं राष्ट्रपतींनी आपल्या पत्रात म्हटलं आहे.

****

वक्फ सुधारणा कायद्याच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात २० मे रोजी सुनावणी होणार आहे. याचिकाकर्त्यांचे वकील कपिल सिब्बल आणि महाअभिकर्ता तुषार मेहता यांनी आपलं निवेदन १९ मे रोजी न्यायालयासमोर सादर करावं असं सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई आणि न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या पीठानं सांगितलं आहे.

****

पाकिस्तानकडे असलेली अण्वस्त्रं आंतरराष्ट्रीय अणु ऊर्जा संस्थेने आपल्या ताब्यात घ्यावीत, असं संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी म्हटलं आहे. ते काल जम्मू आणि काश्मीरची राजधानी श्रीनगर इथे संरक्षण दलांना संबोधित करत होते. ऑपरेशन सिंदूरमध्ये केलेल्या कामगिरीचा संपूर्ण देशाला अभिमान असल्याची भावना राजनाथसिंह यांनी व्यक्त केली, ते म्हणाले....

**संरक्षण मंत्री राजनाथसिंह**

****

भारत पाकिस्तान युद्धात पाकिस्तानला पाठिंबा देणाऱ्या तुर्किएतल्या सुक्या मेव्यावर पुण्यातल्या व्यापाऱ्यांनी बहिष्कार टाकला आहे. देश प्रथम व्यापार नंतर, अशी भूमिका इथल्या व्यापारी संघटनेनं घेतली आहे. या व्यापारी संघटनेचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अभिनंदन केलं आहे. ते काल पुण्यात माध्यमांशी बोलत होते.

मराठा आरक्षणासंदर्भात राज्यसरकार लवकरच आपली भूमिका न्यायालयात मांडेल असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्यात महानगरपालिका निवडणुका वेळेवर घेण्याचा राज्यशासनाचा प्रयत्न असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. या निवडणुका महायुती एकत्रच लढवणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं, ते म्हणाले.

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

या निवडणुकी महायुती म्हणून लढवण्याला केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी समर्थन दिलं आहे. ते काल छत्रपती संभाजीनगर इथं बोलत होते. ऑपरेशन सिंदूर राबवल्याबद्दलही आठवले यांनी सरकारचं कौतुक केलं.

****

भटक्या विमुक्त समाजाला राज्यात कुठेही स्वस्त धान्य दुकानातून धान्य उपलब्ध होणार आहे, या समाजाच्या विविध प्रश्नांवर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली काल मंत्रालयात झालेल्या बैठकीत यासह विविध निर्णय घेण्यात आले. या समाजाला जात प्रमाणपत्र, आधारकार्ड, शिधापत्रिकेसह विविध दाखले देण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर आयोजित करण्याची सूचना बावनकुळे यांनी यावेळी केली.

****

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी ८० टक्के पाण्याचा पुनर्वापर करण्याची आवश्यकता राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केली आहे. ते काल छत्रपती संभाजीनगर इथं गोदावरी पाटबंधारे विकास नियामक मंडळाच्या बैठकीत बोलत होते. जलसंपदा विभागाच्या दोन्ही महामंडळांना स्वायत्त करण्यात येणार असून, या प्रक्रियेसाठी समिती स्थापन केल्याची माहिती विखे पाटील यांनी दिली.

या बैठकीत चारुतांडा साठवण तलाव प्रकल्पास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली. या प्रकल्पामुळे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सोयगाव तालुक्यातील सुमारे ६८० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार असून जवळपासच्या गावांचा सिंचन तसंच पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यास मोठी मदत होणार आहे. इतरही अनेक विषयांवर या बैठकीत चर्चा झाल्याचं वृत्त आहे.

****

ऑपरेशन सिंदूर नंतर भारतीय जनता पक्षातर्फे देशभरात तिरंगा यात्रा सुरु आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव इथं काल भव्य तिरंगा मशाल यात्रा काढण्यात आली. बीड जिल्ह्यात अंबाजोगाई इथं निघालेल्या ‘तिरंगा यात्रेला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. लातूर जिल्ह्यातल्या उदगीर इथंही भव्य तिरंगा यात्रा काढण्यात आली. आम्ही उदगीरकर या बॅनरखाली उदगीर शहर आणि तालुक्यातील नागरीक, महिला तरुण-तरुणी, विद्यार्थी, राजकीय पक्ष आणि सामाजिक संघटनांचे अनेक सदस्य या तिरंगा यात्रेत सहभागी झाले.

****

सैन्य दलाने राबवलेल्या ऑपरेशन सिंदूरबाबत राष्ट्रीय छात्र सेना–एनसीसीचे छत्रपती संभाजीनगर इथले असोसिएट एनसीसी ऑफीसर लेफ्टनंट डॉ गजानन सानप यांनी समाधान व्यक्त केलं आहे. आपल्यावर हल्ला करणाऱ्यांच्या घरात घुसून आपण उत्तर देऊ शकतो, असा आत्मविश्वास या कारवाईने दिल्याचं मत डॉ सानप यांनी व्यक्त केलं, ते म्हणाले...

**लेफ्टनंट डॉ गजानन सानप**

****

लातूर जिल्ह्यातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांना बाजारपेठ उपलब्ध व्हावी, यासाठी १९ आणि २० मे २०२५ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क मैदानावर जिल्हास्तरीय आंबा महोत्सव आयोजित करण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांच्या संकल्पनेतून होणाऱ्या या महोत्सवात आंबा विक्रीकरता स्टॉल नोंदणीसाठी शेतकऱ्यांनी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असं आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आर. टी. जाधव यांनी केलं आहे.

****

खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेचा काल समारोप झाला. या स्पर्धेत १५८ पदकांची कमाई करत महाराष्ट्र पदक तालिकेत अव्वल स्थानावर राहिला. यात ५८ सुवर्ण, ४७ रजत आणि ५३ कांस्यपदकांचा समावेश आहे. या स्पर्धेत हरियाणा ११७ तर राजस्थान ६० पदकांसह अनुक्रमे दुसऱ्या आणि तिसऱ्या स्थानावर आहेत.

****

शिवसेना नेते – युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली आज छत्रपती संभाजीनगर इथं भव्य हल्लाबोल महामोर्चा काढण्यात येणार आहे. विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी ही माहिती दिली. आज सायंकाळी साडे चार वाजता क्रांती चौकात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करून मोर्चास सुरुवात होणार आहे

****

इंडियन मेडिकल असोसिएशन– भारतीय वैद्यक संघटनेच्या राष्ट्रीय विधी शाखेच्या स्थायी समितीवर छत्रपती संभाजीनगर इथले डॉ. अनुपम टाकळकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ टाकळकर हे आयएमएच्या छत्रपती संभाजीनगर शाखेचे

अध्यक्ष आहेत. त्यांच्या या निवडीबद्दल शहरातील वैद्यकीय वर्तुळातून त्यांचं अभिनंदन करण्यात आलं.

****

हवामान

जालना जिल्ह्यात भोकरदन तालुक्यातल्या सुरंगळी इथं काल वीज पडून शेतकऱ्याचा मृत्यू झाला. बाजीराव दांडगे असं या शेतकऱ्याचं नाव असून ते काल शेतात बाजरीची सोंगणी करत असतानाच त्यांच्यावर वीज कोसळली.

****